महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ
हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, सेनापती बापट मार्ग,
एलफिन्स्टन, मुंबई ४०००१३
जा.क्र.:मका/कार्यक्रम/२०१४-१५/४७९ दिनांक : १६/०४/२०१४

# परिपत्रक

**विषय :- मंडळाला त्रिपक्षीय वर्गणी देणाऱ्या कामगाराने कारखाने/गिरणी बंद पडल्यामुळे आर्थिक दुरावस्थेमुळे आत्महत्या केली असल्यामुळे त्यांच्या कुटुंबियाना आर्थीक मदत करण्याबाबत.**

संदर्भ :- १) ठराव क्र.काकमं/सचिव/१८/१८/३/६-१/२००५/७९ दि.१४/०२/२००५.
२) सीओ/पीएडी/२००४-०५/४०१ दि. ०२/०३/२००५.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या अन्वये मंडळाला त्रिपक्ष वर्गणी देणाऱ्या कामगाराने कारखाने/गिरणी बंद पडल्यामुळे आर्थिक दुरावस्थेमुळे व मानसिक परिस्थितीने खचून जाऊन आत्महत्या केली असल्यास त्यांच्या दुदैवी कामगारांच्या कुटुंबियांना मंडळाकडून रु.१.०० लाख (रुपये एक लाख) फक्त **आर्थिक मदत** म्हणून मंजुर करण्याची मंडळाची योजना आहे. योजनेचे नियम अटी हे पुढीलप्रमाणे राहतील.

| अ.क्र. | - : नियम व अटी :- |
|---|---|
| १. | आत्महत्या ही आर्थीक अडचणीतून झालेली असल्याचे पुरावे असावेत. |
| २. | आत्माहत्या केलेल्या कामगारांवर अवलंबून असलेली त्यांची मुले अल्पवयीन (वय वर्षे १८खालील) असावीत. |
| ३. | आत्माहत्या केलेल्या कामगारांच्या पती/पत्नीला नोकरी नसावी. |
| ४. | पेन्शन/ग्रॅच्युईटी/प्रॉव्हीडंड फंड इत्यादी कायदेशीर (ड्युज) देय रक्कमा त्याला वेळेवर न मिळाल्यामुळे तो कर्जबाजारी झाला असेल व आर्थिक विवंचनेतून त्याने आत्महत्या केलेली असावी. |
| ५. | आत्माहत्या केलेल्या कामगारांच्या कायदेशीर वारसांना नियमित आर्थिक उत्पन्नाचे साधन नसावे. |
| ६. | नोकरीस असताना तो कामगार महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाची सहामाही वर्गणी भरणारा असायला हवा. |
| ७. | व्यसन,कौटुंबिक कलह,अगर अन्य कारणांमुळे आत्महत्या केलेली नसावी. |
| ८. | हत्या,अपघाती मृत्यू अशा कारणांमुळे मृत्यु आलेला नसावा. |
| ९. | मेडीकल,पोलीस व जिल्हाधिकारी यांचा अहवाल आत्महत्या केली असा असायला हवा,तो मंडळाच्या विभागीय सहाय्यक कल्याण आयुक्तांनी प्राप्त करुन घ्यावा. |
| १०. | मंडळाने विहित केलेल्या सोबत नमुन्यात फॉर्म भरुन घेऊन त्यासोबतच्या कागदपत्रांची छाननी करुन अर्ज मध्यवर्ती कार्यालयात सादर करावा त्यानंतर मंडळाची मान्यता घेवून मंजुरी देण्यात येईल. |

परिपत्रकातील नियम व अटी यांचे काटेकोरपण पालन करुन अर्ज मंजूरीसाठी मध्यवर्ती कार्यालयाकडे पाठवावे.

(स्वाक्षरी)
**कल्याण आयुक्त**

प्रत-
१. सर्व अधिकारी, म.का./ क्रिडा भवन, मुंबई
२. सर्व विभाग प्रमुख, सर्व विभागिय कार्यालय
३. सर्व सहायक लेखा अधिकारी, सर्व विभागिय कार्यालय.
४. सर्व गट प्रमुख, सर्व गट कार्यालय
५. सर्व केंद्र प्रमुख, सर्व केंद्र
६. कल्यान आयुक्तांचे स्वीय सहायक म.का. मुंबई